# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

## ग्रामगीता व्याख्यानमालेचे आयोजन ७ व ८ ऑगस्टला

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने व प्रचारभीष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती, अमरावती यांचेकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून 'प्रचारभीष्म शामरावदादा मोकदम स्मृती ग्रामगीता' व्याख्यानमालेचे प्रथमपुष्प महिला कला, वाणिज्य महाविद्यालय, चांदुर रेल्वे, जि. अमरावती येथे बुधवार, दि. ७ ऑगस्ट, २०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आले आहे.

व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर भूषविणार असून 'राष्ट्रसंतांची ग्रामकुटुंब संकल्पना' या विषयावर ख्यातनाम वक्ते तथा नाशिक येथील शब्दमल्हार वाङ्मयीन नियतकालिकाचे संपादक डॉ. स्वानंद बेदरकर सन्माननीय वक्ते म्हणून अभ्यासपूर्ण व्याख्यान देणार आहेत. याप्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावतीचे डॉ. नितीन धांडे, प्रचारभीष्म शामरावदाद मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समितीचे अध्यक्ष श्री मधुभाऊ घारड यांची प्रामुख्याने उपस्थिती याप्रसंगी लाभणार आहे.

द्वितीयपुष्प श्री वसंतराव नाईक महाविद्यालय, धारणी, जि. अमरावती येथे दि. ८ ऑगस्ट, २०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता संपन्न होणार असून 'राष्ट्रसंतांची ग्रामकुटुंब संकल्पना' या विषयावर ख्यातनाम वक्ते तथा नाशिक येथील शब्दमल्हार वाङ्मयीन नियतकालिकाचे संपादक डॉ. स्वानंद बेदरकर अभ्यासपूर्ण व्याख्यान देतील. अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर भूषविणार असून, याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, दयाराम पटेल स्मारक ट्रस्ट, धारणी, जि. अमरावतीच्या अध्यक्ष सौ. विणाताई रमेश मालवीय व प्रचारभीष्म शामरावदाद मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समितीचे अध्यक्ष श्री मधुभाऊ घारड यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.

चांदुर रेल्वे व धारणी येथील व्याख्यानमालेकरिता सर्व नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, महिला कला, वाणिज्य महाविद्यालय, चांदुर रेल्वे, जि. अमरावतीचे प्राचार्य डॉ.आर.एस. हावरे व श्री वसंतराव नाईक महाविद्यालय, धारणी, जि. अमरावतीचे प्राचार्य डॉ.सी.के. देशमुख यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २६/०७/२०१९.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

C:Users/PRO/Desktop/University News 2019 206